॥ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

ACADEMIC (AFFILIATION) SECTION

Phone: (02462) 215242 (Ext. - 152)
Fax:(02462) 215572

Website: srtmun.ac.in
email: affiliation@srtmun.ac.in

शैक्षणिक वर्ष २०२७–२८ करिता संलग्नीकरणाचे नुतनीकरणाचे प्रस्ताव व शुल्क हे **E-Samarth** या **Online Portal** द्वारे सादर करणे बाबत.

::परिपत्रक::

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२७–२०२८ साठी महाविद्यालयाचे तात्पुरते, कायम संलग्नीकरण ,तुकडी, नैसर्गिक वाढ, संशोधन केंद्र, यांचे नुतनीकरण चे प्रस्ताव हे ई– समर्थ (E-Samarth) या Online संगणकीय प्रणालीद्वारे दि. ०१/०९/२०२६ ते ३०/०९/२०२६ पर्यंत महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११४ नुसार विद्यापीठात सादर करण्यात यावेत.

सर्व नुतनीकरणाचे प्रस्ताव ई– समर्थ (E-Samarth) या संगणकीय कार्य प्रणालीद्वारे स्विकारण्यात येणार आहेत. त्यामुळे सर्व संलग्नीत महाविद्यालयांनी ई–समर्थ (E-Samarth) या संगणकीय कार्य प्रणालीवर महाविद्यालयाची माहिती (College Profile) मध्ये अद्यायावत करावी. व त्यांनतरच संलग्नीकरणाचा नुतनीकरण प्रस्ताव सादर करावा. संलग्नीकरण नुतनीकरणाचे शुल्क हे (E-Samarth) या संगणकीय प्रणालीद्वारे घेण्यात येणार आहे ते शुल्क महाविद्यालयातील संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांनी सोबत जोडलेल्या संलग्नीकरण शुल्क तक्त्यानुसार तपासणी करून खात्री करावी व त्यात तफावत आढळुन आल्यास संलग्नीकरण विभागातील संबंधित जिल्हयाचे कार्य/काम बघणारे कर्मचारी यांच्या निर्दशनास आणुन देऊन त्यात सुधारणा करून घ्यावी त्यानंतरच शुल्क (Online Payment Gateway) .या द्वारे भरण्यात यावेत यासाठी तांत्रिक अडचण असल्यास ९३५९०२६१२२ या भ्रमणध्वनीवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

महाविद्यालयाने नुतनीकरणाचे प्रस्तावासोबत खालील कागदपत्रे जोडावीत व महत्वाच्या बाबींचीही नोंद घ्यावी:

०१.ई– समर्थ द्वारे सादर केलेल्या नुतनीकरणाचा प्रस्तावांची प्रत प्रिंट घेऊन प्रस्ताव एका प्रतीमध्ये पुरक कागदपत्रासह सादर करावा.

०२.E-Samarth संगणकीय प्रणाली द्वारे शैक्षणिक वर्ष २०२७–२०२८ करिता संलग्नीकरण शुल्क भरल्यानंतर दोन दिवसाच्या आत त्याबाबतची मुळ पावती संलग्नीकरण विभागामध्ये मुळ प्रस्तावासह सादर करावी.

०३.नुतनीकरणाचा मुळ प्रस्ताव सादर करताना प्रस्तावाच्या मुख्यपृष्ठावर महाविद्यालयाचे नाव, सांकेतांक क्रमांक, पदवी/पदव्युत्तर/संशोधन केंद्रासह नुतनीकरण यापैकी ज्याकरिता प्रस्ताव सादर करायचा आहे ते नमुद करावे, प्रस्तावात काही त्रुटी असल्यास संपर्कासाठी महाविद्यालयातील प्राचार्य व संबंधित कर्मचारी यांचे नाव, भ्रमणध्वनी क्रमांक नमुद करावा.

०४.प्रस्तावासोबत जोडण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांवर पृष्ठ क्रमांक लिहावा व त्या नोंदीनुसार अनुक्रमानिका जोडावी.

०५.महाविद्यालयात सध्या सुरू असलेल्या बी.ए, बी.कॉम, बी.एस्सी, व एम.ए, एम. कॉम, एम.एस्सी या व इतर अभ्यासक्रम/विद्याशाखा विषयांच्या मुळ तुकडीस व अतिरिक्त तुकडीस शासनाने दिलेले मंजुरी आदेश, विद्यापीठाने प्रथम मुळ तुकडीस व अतिरिक्त तुकडीस दिलेले संलग्नीकरण पत्र यांच्या छायांकित प्रती जोडाव्यात.

०६.शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ करिता संलग्नीकरण शुल्क भरलेल्या पावतीची छायांकित व साक्षांकित प्रत सादर करावी.

०७.विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व क्रीडा विभाग या सर्व विभागाचे ना– देय (No-Dues) प्रमाणपत्र सादर करावे . तसेच परीक्षा केंद्रासाठी घेण्यात आलेल्या अग्रीम रक्कमेचे समायोजन केल्याबाबतचे लेखा विभागाचे (No-Dues) ना– देय प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच संलग्नीकरणाचे प्रस्ताव स्विकारले जातील.

०८.या विभागाचे परिपत्रक जावक. क्र. शैक्षणिक/संलग्न–०३/२०२५–२०२६/३३९ दि. १०/०७/२०२५ नुसार महाविद्यालयाचे नॅक मुल्यांकन/पुर्नमुल्यांकन बाबतची माहिती सादर करावी.

०९.विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयांनी संलग्नीकरण प्रस्तावासोबत महाविद्यालयात कार्यरत प्राचार्य व प्राध्यापकांची यादी सादर करावी. (नाव शैक्षणिक अर्हता, अनुभव, रूजु दिनांक विद्यापीठ मान्यता आहे किंवा नाही हे नमुद करावे)

१०.महाविद्यालयात विज्ञान विद्याशाखा असल्यास विषयनिहाय प्रयोगशाळेची माहिती व (Geotag) सह फोटो सादर करावी.

११.महाविद्यालयातील ग्रंथालयामध्ये अभ्यासक्रम/विद्याशाखानिहाय उपलब्ध पुस्तकांची यादी व ते खरेदी केल्याचा पुरावा व ग्रंथालयाचा फोटो (Geotag) सह सादर करावे.

१२.या विभागाचे परिपत्रक जावक. क्र. शैक्षणिक/संलग्न–०३/२०२४–२०२५/१५२४ दि. ०७/०३/२०२५ नुसार महाविद्यालयाची वेबसाईट तयार करून त्याचीही माहिती प्रस्तावासोबत सादर करावी.

१३.महाविद्यालयाची इमारत स्व:ताची/भाडयाची असल्यास त्याचे पुरक कागदपत्रे, जमीन अकृषक व जमीन मालकी बाबतचा पुरावा सादर करावा.

१४.नवीन संशोधन केंद्र मान्यता व नव्याने कायम संलग्नीकरणाचे करणेसाठीचे प्रस्ताव हे Offline पध्दतीने संलग्नीकरण विभागामध्ये सादर करावे त्यासाठी प्रस्तावाचा नमुना विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१५. संलग्नीकरणाचे नुतनीकरण प्रस्ताव सर्व संलग्नीत महाविद्यालयांनी उपरोक्त प्रमाणे दि. ०१/०९/२०२६ ते ३०/०९/२०२६ या कालावधीत सादर करावेत. विहित मुदतीत प्रस्ताव सादर न केल्यास विद्यापीठ नियमानुसार प्रस्तावास प्रती अभ्यासक्रम, प्रती विद्याशाखा, प्रती तुकडी व प्रती विषय याप्रमाणे प्रति दिन रू. १००/– एवढे विलंब शुल्क भरावे लागेल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

१६. शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ पासुन मा. व्यवस्थापन परिषद बैठक क्र. ७४ विषय क्र. ०५/७४–२०२१ दि. ०२/०७/२०२१ व विस्तारीत ०६/०७/२०२१ अन्वये झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने संलग्नीकरण शुल्कात ०७ टक्के वाढ करण्यात आलेली आहे. तसेच सदरील एकुण संलग्नीकरण शुल्कावर १८ टक्के जीएसटीसह (GST) भरण्यात यावी. सोबत शैक्षणिक वर्ष २०२७–२०२८ साठी सुधारीत संलग्नीकरण शुल्काचा तक्ता जोडलेला आहे. त्यानुसार सर्व शुल्क जीएसटीसह (GST) भरण्यात यावेत.

सदर परिपत्रक हे विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in संकेतसथळावर Affiliation या शिर्षकाअंतर्गत प्रसिध्द करण्यात येत आहे.

''ज्ञानतीर्थ'', परिसर,
विष्णूपुरी, नांदेड–४३१ ६०६
जा.क्र.शैक्षणिक/संलग्न–०३/२०२६–२०२७/490
दिनांक :–३१/०८/२०२६

उपकुलसचिव
शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग

**प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :–**

१. मा.कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा.प्र.कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३. मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
४. सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर Circular-Affiliation Section या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करावे.